RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक २१] गुरुवार ते बुधवार, मे २७-जून २, २०२१/ज्येष्ठ ६-१२, शके १९४३ [पृष्ठे १९ किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन
## शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, नवी मुंबई यांजकडून

#### मनाई आदेश

क्रमांक कोरोना/मनाई आदेश/१७८९/२०२१.— **ज्याअर्थी,** जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, नवी मुंबई शहरात गतीने पसरत असल्याचे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७, दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्याशिवाय भारत सरकार आरोग्य मंत्रालय, " महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी जाहिर केलेप्रमाणे " कोरोनाग्रस्त रूग्णांच्या संपर्कात लोकांनी येऊ नये. तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदीच्या अनुषंगाने जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असल्याबाबत माझी खात्री झालेली आहे.

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग - १ मध्ये उप विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक ३ मधील पान क्र. ४ मधील फौजदारी दंड प्रक्रीया संहिता, १९७३ चा क्र. एमएससी १२७४/ फि-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रीया संहिता, १९७३(II १९७४)चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करून कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

**त्याअर्थी,** मी, डॉ. जय जाधव, पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून शासनाच्या दिनांक १ एप्रिल १९७४ चे अधिसूचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रकिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्र. ५ मधील नमूद सूचनांच्या अधिन राहून दिनांक १४ एप्रिल २०२१ रोजीचे रात्री २०-०० वा. पासून दिनांक १ मे २०२१ रोजीचे सकाळी ०७-०० वा. चे दरम्यान लागू करीत आहे. त्यादरम्यान खालिल निर्देशनाचे पालन करण्यात येईल.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ बाबत.

- ❖ वैध कारणाशिवाय कोणीही सार्वजनिक ठिकाणी फिरणार नाही.
- ❖ खालील नमूद सेवा/आस्थापना वगळून सर्व आस्थापना, सार्वजनिक ठिकाणे, उपक्रम व सेवा बंद राहतील.
- ❖ अत्यावश्यक श्रेणीतील सेवा व उपक्रमासाठी आवश्यक वाहतूक व कृती चालू राहतील.
- ❖ खालील नमूद अपवादात्मक श्रेणीतील सेवा व क्रियांना कामाच्या दिवशी सकाळी ०७-०० वाजता पासून ते रात्रौ २०-०० वाजेपर्यंत त्यांच्या वाहतूक व इतर कृतींवर बंधन असणार नाहीत.

❖ स्थानिक परिस्थितीचा विचार करून अपवादात्मक श्रेणीतील सेवांसाठी आवश्यक घरगुती मदतनीस चालक, सेवक/परिचर यांच्याविषयी स्थानिक प्रशासनाने निर्णय घेण्यात यावा.

२. **अत्यावश्यक श्रेणीमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.** (Essential Category includes the following)

- हॉस्पिटल, निदान केंद्रे, चिकित्सालय, वैद्यकीय विमा कार्यालय, औषध विक्रेते, औषध निर्माण कंपनी व इतर वैद्यकीय आरोग्यविषयक सेवा व त्यांना सहाय्य करणाऱ्या निर्मिती, वितरण केंद्र, विक्रेते, वाहतूक व पुरवठा साखळी, लसनिर्मिती व वितरण, सॅनिटायझर, मास्क वैद्यकीय उपकरणे व त्यांना सहाय्यक कच्चा माल केंद्र व मदत सेवा.
- व्हेटरीनरी सेवा, ॲनिमल केअर सेंटर, पाळीव प्राण्यासाठी खाद्य दुकाने.
- किराणा, भाजीपाला दुकाने, दुग्धालय, बेकरी, मिठाई विक्री व इतर अन्नधान्य विक्री दुकाने.
- शीतगृह व गोदाम सेवा.
- सार्वजनिक वाहतूक–विमानसेवा, रेल्वे, टॅक्सी, ऑटो रिक्षा, सार्वजनिक बसेस.
- राजकीय दुतावास व त्यासंबंधित सेवा.
- स्थानिक प्रशासनाची मान्सूनपूर्व तयारीची कामे.
- स्थानिक प्रशासनाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सार्वजनिक सेवा.
- भारतीय रिझर्व्ह बॅंक व त्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या अत्यावश्यक सेवा.
- सेबी व सेबी अंतर्गत मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर्स संस्था उदा. स्टॉक एक्सचेंज, डिपॉजीट्रीज, क्लियरिंग कॉर्पोरेशन व सेबी अंतर्गत नोंदणीकृत संस्था व मध्यस्थी संस्था.
- दूरसंचार सेवा व्यवस्थापनासाठी आवश्यक सेवा.
- मालाची वाहतूक.
- पाणीपुरवठा सेवा.
- कृषीविषयक संबंधित क्रिया/सेवा अव्याहतपणे चालू राहण्यासाठी कृषी क्षेत्रासाठी आवश्यक संबंधीत क्रिया जसे बियाने, खते, हत्यारे इतर शेतीविषयक प्रदाने इत्यादी चालू राहतील.
- सर्व वस्तुंची आयात–निर्यात सेवा.
- ई– कॉमर्स.
- मान्यताप्राप्त प्रसारमाध्यम.
- पेट्रोल पंप आणि पेट्रोलियम संबंधित उत्पादने व किनाऱ्यावरील व किनाऱ्यापासून काही अंतरावरील निर्मिती.
- सर्व प्रकारच्या कार्गो सेवा.
- डेटा सेंटर क्लाउड सेवा पुरविणारे/पायाभूत सेवा सुविधा संदर्भात माहिती तंत्रज्ञान सेवा संस्था.
- शासकीय व खाजगी सुरक्षा संस्था.
- विद्युत व गॅस वितरण सेवा.
- ए.टी.एम. सेवा.
- टपाल सेवा.
- बंदरे व त्यासंबंधित उपक्रम.
- कस्टम हाऊस, दलाल, लस वाहतुकीसंबंधित परवानाधारक मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर, औषध निर्मिती व जीव सहाय्यक औषधे.
- अत्यावश्यक सेवेसाठी पॅकेजिंग साहित्य/निर्मिती केंद्रे कच्चा माल.
- पावसाळी हंगामासाठी, व्यक्तींसाठी तसेच संस्थांसाठी पावसाळ्याच्या हंगामासाठी साहित्याच्या उत्पादनामध्ये गुंतलेली एकके.
- स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने अत्यावश्यक सेवा म्हणून नमूद केलेली सेवा.

**अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी वर नमूद केलेल्या सेवाबद्दल खालील सामान्य तत्वांचे पालन करण्यात यावे.**

● सर्व अमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाने हे लक्षात घेतले पाहिजे की, कठोर निर्बंध हे व्यक्तींच्या हालचालीशी संबंधित आहे. परंतु माल व वस्तुंशी संबंधित नाही.

● वरील विभागात नमूद केलेल्या सेवांच्या कामासंबंधित हालचालीसाठी व अंतर्गत प्रवासासाठी परवानगी राहील.

● उपरोक्त सेवांशी निगडीत प्रासंगिक क्रियांना आवश्यक सर्व सेवा प्रक्रीया संसाधनांना/संघटनांना अत्यावश्यक सेवा समजले जाईल. **तत्व– " अत्यावश्यकतेसाठी आवश्यक हे देखील अत्यावश्यक ".**

३. **अत्यावश्यक सेवामध्ये समाविष्ठ असलेल्या आस्थापनांनी खालील मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करावे.**

१. अत्यावश्यक सेवा चालू ठेवताना आस्थापनेतील मालक, कामगार व आस्थापनाच्या आवारातील ग्राहक यांनी कोव्हीड–१९ चे अनुषंगाने कोव्हीड योग्य वर्तणूक अवलंबविण्यात यावी.

२. अत्यावश्यक सेवा देणाऱ्या दुकानांचे मालक व दुकानांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड लसीकरण करून घेण्यात यावे. अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या दुकानदारांनी पारदर्शक काच, शिल्डचा वापर, इलेक्ट्रॉनिक पेमेन्ट इत्यादी सुरक्षात्मक उपाययोजनांचा अवलंब करावा.

३. अत्यावश्यक सेवा संबंधित व्यक्तींच्या हालचालीसाठी परवानगी राहील.

४. कोव्हिड प्रतिबंधात्मक नियम मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचारी ग्राहक यांच्याविरुद्ध प्रत्येकी रक्कम रुपये ५०० याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल, सदर नियमांचे उल्लघन झाल्यास आस्थापना विरुद्ध रक्कम रुपये १००० याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच वारंवार नियमांच्या भंग झाल्यास सदर आस्थापनांचे परवाना रद्द करणे अथवा केंद्र शासन कोव्हीड–१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल असे त्या दिवसापर्यंत संबधित आस्थापना बंद करण्यात येतील.

५. किराणा, भाजीपाला, फळ विक्रेते, मिठाई, बेकरी, अन्नधान्य विक्री दुकाने स्थानिक प्रशासनाने ज्या ठिकाणी लोकांची गर्दी होते व सदरच्या ठिकाणी लोकांची घनता जास्त आहे. अशा ठिकाणांचा अभ्यास करावा. अशा ठिकाणांच्या बाबतीत व त्यांच्या कालावधीबाबत योजना तयार करण्यात याव्या. विक्रेत्यांची कायमस्वरूपी संरचना नसल्यास त्यांच्यासाठी मोकळ्या सार्वजनिक जागा शोधण्यात याव्यात. सदर ठिकाणी कोव्हीडचा प्रसार होणार नाही यासाठी स्थानिक प्राधिकरणाने योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या.

६. आस्थपना बंद असलेल्या मालकांनी स्वत: व त्यांच्या आस्थपनामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचे लवकारत लवकर लसीकरण पूर्ण करून घेण्यात यावे. पारदर्शक काच, शिल्डचा वापर, इलेक्ट्रॉनिक पेमेन्ट इत्यादी सुरक्षात्मक उपाययोजना राबविण्याची तयारी करण्यात यावी.

४. **सार्वजनिक वाहतूक. (Public Transport)**

● ऑटो रिक्षामध्ये चालक व दोन प्रवासी यांची परवानगी राहील.

● टॅक्सीमध्ये अथवा चारचाकी वाहनामध्ये चालक व वाहनाच्या क्षमतेच्या ५० टक्के प्रवाशांना परवानगी राहील.

● नागरिकांनी प्रवास करतांना मुखपट्टी (मास्क) वापर करणे बंधनकारक राहील. नियमांचे उल्लघंन झाल्यास रक्कम रुपये ५०० याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

● सर्व प्रकारची चार चाकी वाहने, रिक्षा, टॅक्सी, कॅबमधुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी मुखपट्टी (मास्क) वापर करणे बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन झाल्यास वाहन चालक आणि प्रवासी रक्कम रुपये ५०० याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

● बसमध्ये उभे राहून प्रवास करता येणार नाही. परिवहन खात्याचे परवानगीने आसन क्षमते इतक्याच प्रवाशांना प्रवास करता येईल.

● सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणाऱ्या व्यक्तींनी मास्कचा वापर करण्यात यावा.

● चारचाकी वाहनांमध्ये एखाद्या व्यक्तींनी मास्कचा वापर करण्यास टाळाटाळ केल्यास संबंधित व्यक्ती व चालक यांचेवर दंड आकरण्यात येईल.

● सर्व वाहनांची प्रत्येक फेरीनंतर निर्जंतुकीकरण करण्यात यावे.

● सार्वजनिक वाहतूक करणारे चालक व इतर कर्मचारी ज्यांचा सर्वसामान्य जनतेशी संपर्क येतो त्यांनी लवकरात लवकर केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घेण्यात यावे.

● बाहेरगावी जाणाऱ्या रेल्वेमध्ये सर्वसाधारण डब्यामध्ये प्रवासी उभ्याने प्रवास करणार नाही याची रेल्वे प्रशासनाने दक्षता घ्यावी.

● सार्वजनिक वाहतूकीशी संबंधित असलेले कर्मचारी यांना प्रवास करण्यास मुभा राहील.

● सार्वजनिक वाहतूकीस काही निर्बंधासह परवानगी देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सार्वजनिक वाहतूक सुरळीत चालू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रासंगिक सेवा यादेखील सुरू राहतील. विमानतळासाठी आवश्यक कार्गो सेवा तसेच तिकीट सेवा चालू राहतील.

● कोणत्याही बस, ट्रेन, विमानातून प्रवास केलेल्या व प्रवास करण्यास निघणाऱ्या व्यक्ती त्यांच्या निवासस्थानापासून व पर्यंत जाण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीद्वारे वैध तिकीटाच्या आधारे प्रवास करू शकतात.

**५. सुट देण्यात आलेल्या आस्थापना सेवा (Exemption Category)**

**(अ) कार्यालय—**

❖ खालील कार्यालयांचा अपवादात्मक श्रेणीमध्ये समावेश होतो :—

१. केंद्र राज्य व स्थानिक शासकीय कार्यालये त्यांच्या संबंधित वैधानिक प्राधिकरणे व संस्था.

२. सहकारी व सार्वजनिक उपक्रम आणि खाजगी बँका.

३. अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांची कार्यालये.

४. विमा/मेडीक्लेम कंपन्या.

५. औषध उत्पादन व्यवस्थापनासाठी आवश्यक औषध कंपनी कार्यालय.

६. भारतीय रिझर्व्ह बँक नियंत्रित प्राथमिक डीलर्स, सी.सी.आय.एल., एन.पी.सी. आय. व भारतीय रिझर्व्ह बॅक नियंत्रित बाजारपेठामध्ये कार्यरत वित्तीय बाजारातील सहभागी संस्था व मध्यस्थी संस्था.

७. सर्व नॉन बँकिंग वित्तीय महामंडळ.

८. सर्व सुक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था.

९. न्यायालये, न्यायाधिकरण/चौकशी आयोगाचे कामकाज चालू असल्यास वकिलांची कार्यालय.

१०. उपरोक्त कार्यालयामध्ये ५० टक्के क्षमतेने कामकाज करण्यात यावे. अपवाद— कोव्हीड–१९ महामारीशी संबंधित शासकीय कार्यालय.

११. उपरोक्त कार्यालयामध्ये उपस्थित राहणेकरिता प्रवासास परवानगी राहील.

१२. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास गरज पडल्यास कार्यालयांचा समावेश करता येईल.

१३. शासकीय कार्यालयामध्ये कोणत्याही अभ्यागतांना परवानगी देण्यात येऊ नये.

१४. कार्यालय अथवा कंपनीमधील बैठकीसाठी कार्यालयाबाहेरील व्यक्ती उपस्थित राहणे आवश्यक असल्यास ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

१५. खाजगी व शासकीय कार्यालयातील कर्मचारी यांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड–१९ लसीकरण पूर्ण करून घेण्यात यावे.

**(ब) खाजगी वाहतूक— (Private Transport)**

● खाजगी बसेससह, खाजगी वाहने आपत्कालीन व अत्यावश्यक कामासाठी व सेवेसाठी सदर आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे वैध कारणासाठी चालू राहतील. प्रवासी क्षमता सार्वजनिक वाहतूकीप्रमाणे लागू असेल.

● सदर नियमाचे उल्लंघन झाल्यास रक्कम रुपये १००० याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड–१९ लसीकरण करून घ्यावे.

● खाजगी बसेस वाहनांच्या आसन क्षमतेनुसार सुरू राहतील. प्रवासी उभे राहून प्रवास करण्यास प्रतिबंध राहिल.

**(क) उपहारगृहे, बार आणि हॉटेल— (Restaurants, Bars, Hotels)**

● सर्व बार, उपहारगृहे बंद राहतील, उपहारगृहे व बार हॉटेलच्या भाग असेल तर, तेथे राहणाऱ्या अभ्यागतांसाठी चालू राहतील.

● घरपोच सेवा (होम डिलिव्हरी) चालू राहतील. ऑर्डर करण्याचे उद्देशाने किंवा पिकअपसाठी कोणत्याही उपहारगृहे अथवा बार या ठिकाणी भेटी देता येणार नाही.

● उपहारगृहे व बार हॉटेलचा भाग असेल तर, तेथे राहणाऱ्या अभ्यागतांसाठी सुरू ठेवता येतील. बाहेरील व्यक्तींसाठी प्रवेश असणार नाही. बाहेरच्या व्यक्तींनी उपरोक्त सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. हॉटेलमध्ये राहणाऱ्या ग्राहकास अत्यावश्यक सेवेशी संबंधित कामाव्यतिरिक्त वैध कारणाशिवाय बाहेर फिरता येणार नाही.

● होम डिलिव्हरी देणाऱ्या व्यक्तींचे केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड–१९ लसीकरण करून घ्यावे.

● एकापेक्षा जास्त कुटुंब असलेल्या इमारतीमध्ये घरपोच सेवाही इमारतीच्या प्रवेशद्वारापर्यंत मर्यादित असली पाहिजे. इमारतीमधील अंतर्गत हालचाल ही इमारतीमध्ये नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी करण्यात यावी. घरपोच सेवा देणारे व इमारतीमध्ये नियुक्त कर्मचारी यांचा संवाद हा शिस्तबद्ध व कोव्हीड योग्य असणे आवश्यक आहे.

● उपहारगृहे व बार या ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड–१९ लसीकरण करून घ्यावे.

● सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर प्रत्येकी रक्कम रुपये १,००० व संबंधित आस्थापनावर रक्कम रुपये १०,००० याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनांचे परवाना रद्द करणे अथवा मे. केंद्र शासन कोव्हीड–१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील.

**(ड) उत्पादन क्षेत्र— (Manufacturing Sector)**

❖ खालील उत्पादन केंद्रे चालू राहतील आवश्यकतेनुसार विविध शिफ्टमध्ये कार्यरत असतील.

● अत्यावश्यक वस्तू व सेवांची निर्मिती करणारे उत्पादन क्षेत्र चालू राहतील.

● निर्यात करणाऱ्या उद्योगांना निर्यात दायित्व पूर्ण करणे आवश्यक आहे.

● जे उद्योग त्वरित थांबविता येत नाहीत तसेच चालू होण्यासाठी लक्षणीय वेळ घेतात असे उद्योग ५० टक्के क्षमतेने चालू राहतील.

● उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन हे कोणताही उद्योग तरतुदीचा कोणताही गैरवापर करीत नाही व आवश्यक सर्व दक्षतांचे पालन करीत आहे याची दक्षता घेतील. सदरचे उद्योग आपल्या कामगारांना आपल्या उद्योगाचे आवारात राहण्याची व्यवस्था करतील किंवा कामगार उद्योग आवाराचे बाहेर राहत असल्यास त्यांची हालचाल शक्य तितक्या प्रमाणात एकाकी असावी.

● ज्या उद्योगामध्ये कामकाज करणाऱ्या कामगारांची उद्योगाचे आवारामध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अथवा उद्योगाच्या बाहेर ज्या ठिकाणाहून कामगार एकाकी प्रवास करून कामाचे ठिकाणी येत असतील व व्यवस्थापनासाठी १० टक्के लोक बाहेरून येत असतील ते उद्योग चालू ठेवता येतील. उद्योगांचे बाहेर कामगारांना प्रवास अथवा हालचाल करता येणार नाही असे उद्योग हे वेगवेगळ्या शिफ्टनुसार चालू ठेवता येतील.

● सर्व कामगारांचे केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

● उत्पादन क्षेत्र व कारखाने यांनी खालील बाबींचे पालन करण्यात यावे.

१. उत्पादन क्षेत्र व कारखाने या ठिकाणी प्रवेश करणाऱ्या कामगारांचे थर्मल स्क्रिनींग करण्यात यावे.

२. एखादा कामगार कोरोना बाधीत असल्याचे आढळ्यास त्याचे संपर्कात आलेले इतर कामगारांना क्वारंटाईन करण्यात यावे.

३. ज्या उद्योगामध्ये ५०० पेक्षा जास्त कामगार काम करीत आहेत त्या उद्योगांमार्फत क्वारंन्टाईन सेंटर स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये सर्वसाधारण सुविधा पुरविण्यात याव्यात. तसेच सदरचे क्वारंन्टाईन सेंटर हे उद्योगाचे आवाराच्या बाहेर स्थापन करण्यात आल्यास कोरोना बाधीत व्यक्तीस घेऊन जात असताना इतर कोणत्याही व्यक्तीशी संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी.

४. एखादा कामगार कोरोना बाधीत असल्याचे आढळ्यास संबंधित उद्योगक्षेत्र निर्जतुकीकरण होईपर्यत बंद राहतील.

५. गर्दी टाळण्याच्या दृष्टीने दुपारचे जेवण व चहाचा ब्रेक निश्चित करण्यात यावे. एकत्रित खाण्याची ठिकाणे असू नयेत.

६. सार्वजनिक शौचालयाचे वारंवार निर्जतुकीकरण करण्यात यावे.

७. एखादा कामगार कोरोना बाधित असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यास वैद्यकिय रजा मंजूर करण्यात यावी व कामावरून काढून टाकण्यात येऊ नये व त्यास पुर्ण वेतन अदा करण्यात यावे.

८. सदर आदेशान्वये परवानगी नसलेले उद्योग हे आदेशामध्ये नमूद असलेल्या कालावधी पावेतो बंद राहतील.

**(इ) रस्त्याच्या बाजूस असलेले खाद्य विक्रेते. (Roadside Eatable Vendors)**

● रस्त्याचे कडेला असणारे खाद्य विक्रेते /हातगाडीची ठिकाणे सकाळी ०७-०० ते रात्री २०-०० वाजेपावेतो पार्सल व होम डिलीव्हरी सेवा चालू ठेवता येतील. सदर खाद्य विक्रेते / हातगाडीचे ठिकाणी थांबून व उभे राहून खाता येणार नाही.

● पार्सलकरीता प्रतिक्षेत असणाऱ्या ग्राहकांनी काऊंटर पासून सुरक्षित अंतर ठेऊन उभे रहावे.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

● स्थानिक प्रशासनाने पुरेसे मनुष्यबळ नेमून व सीसीटीव्हीद्वारे खाद्य विक्रेत्यावर देखरेख ठेवण्यात यावी.

● सदर आदेशाचा भंग केल्यास खाद्यविक्रेत्याचा व्यवसाय कोरोना महामारी संपेपर्यत बंद ठेवला जाईल.

● नियमांचा भंग झाल्यास नागरिक /आस्थापना विरूद्ध प्रत्येकी रक्कम रूपये ५००/ याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनांचे परवाना रद्द करणे अथवा मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील.

**(फ) वृत्तपत्रे / मॅगझीन / नियतकालीक -**

● वृत्तपत्रे / मॅगझीन / नियतकालीक छपाई व वितरण चालू राहील.

● वृत्तपत्रे / मॅगझीन / नियतकालीक घरपोच सेवा चालू राहतील.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

**६. मनोरंजन / करमणूक, दुकाने, मॉल, शॉपींग सेंटर—**

● सिनेमा हॉल, नाट्यगृह, सभागृहे बंद राहतील.

● मनोरंजनाची ठिकाणे, व्हिडीओ गेम पार्लर बंद राहतील.

● वॉटर पार्क, क्लब्स, जलतरण तलाव, व्यायामशाळा, क्रीडा संकुल बंद राहतील.

● चित्रपट, मालिका, जाहिरातीसाठीचे चित्रीकरण बंद राहील.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

● सर्व दुकाने, बाजारपेठा, मॉल्स अत्यावश्यक सेवा वगळता बंद राहतील.

● सर्व समुद्र किनारे, चौपाट्या, उद्याने , बागा, सार्वजनिक मैदाने बंद राहतील.

७. **धार्मिक/प्रार्थना स्थळे—**

● सर्व धर्मियांची धार्मिक स्थळे व प्रार्थना स्थळे बंद राहतील. धार्मिक स्थळी काम करणारे कर्मचारी व पुजारी यांना दैनंदिन पुजा-अर्चा करता येईल. बाहेरील भक्तांसाठी दर्शन सेवा बंद राहतील.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार लवकरात लवकर कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

८. **केश कर्तनालय/स्पा/सलून/ब्युटी पार्लर—**

● सर्व केश कर्तनालय, स्पा, सलून, ब्युटी पार्लर बंद राहतील.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार लवकरात लवकर कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

९. **शाळा -महाविद्यालये.**

● शाळा महाविद्यालये बंद राहतील.

● १० वी, १२ वी परीक्षांचा अपवाद असेल. १० वी, १२ वी परीक्षेकरीता नियुक्त करण्यात आलेले पर्यवेक्षक व संबंधित कर्मचारी यांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घेण्यात यावे.

● मंडळ / विद्यापीठ किंवा बाहेरील राज्यातील संस्था अथवा मंडळ यांच्या मार्फत घेण्यात येणारी परिक्षा आयोजीत केली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्यास सदर परिक्षा ह्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापनामार्फत परवानगीने चालू राहतील.

● ज्या विद्यार्थ्यास परिक्षेकरीता परिक्षा केंद्रावर हजर राहावयाचे आहे अशा विद्यार्थ्यासोबत एक प्रौढ व्यक्ती व परिक्षा प्रवेश पत्र सोबत घेऊन प्रवास करता येईल.

● सर्व खाजगी शिकवण्या बंद राहतील.

● संबंधितांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार लवकरात लवकर कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

१०. **धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रम**

**(अ) धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रम**

● धार्मिक राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रमास बंदी राहील.

● जिल्ह्यामध्ये सार्वजनिक निवडणूका नियोजित असल्यास जिल्हाधिकारी यांचे परवानगीने राजकीय कार्यक्रमांना खालील निर्बंध लागू राहतील.

● निवडणूक प्रचार करण्यासाठीचे राजकीय कार्यक्रम हे भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार आयोजीत करण्यात यावे. बंदिस्त जागेमध्ये जास्तीत -जास्त ५० व्यक्ती अथवा जागेच्या ५० टक्के क्षमतेनुसार राजकीय कार्यक्रमास परवानगी राहील. मोकळ्या जागेमध्ये जास्तीत- जास्त २०० व्यक्ती तसेच जागेच्या ५० टक्के क्षमतेने राजकीय कार्यक्रमास परवानगी राहील. कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने संरक्षणात्मक उपाययोजनांचे पालन करण्यात यावे.

● निवडणूक कार्यक्रमाचे / प्रचाराचे ठिकाणी देखरेख करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडून अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

● एखाद्या उमेदवाराकडून आदेशाचा २ किंवा त्यापेक्षा जास्त वेळेस भंग झाल्यास सदर उमेदवारास पुढील राजकीय कार्यक्रमासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून परवानगी देण्यात येणार नाही.

● प्रचार सभा, रॅली, कॉर्नर मिटींगसाठी कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने संरक्षणात्मक उपाययोजनांचे पालन करण्यात यावे.

**(ब) लग्न समारंभ**

● लग्नकार्यासाठी जास्तीत-जास्त २५ व्यक्तीस परवानगी राहील. मंगल कार्यालयातील कर्मचारी व सेवा पुरविणारे यांचे केंद्र शासनाचे धोरणानुसार लवकरात लवकर कोव्हीड-१९ चे लसीकरण करून घेण्यात यावे.

● अथवा कोविड-१९ निगेटिव्ह (RTPCR/RAT/Tru NA/CBNAAT) दाखला सोबत बाळगणे अनिवार्य आहे सदर नियमांचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तीवर रुपये १०००/- व संबंधित आस्थापनावर रक्कम रुपये १००००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

● वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनाचे परवाना रद्द करणे अथवा मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपुर्णपणे असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबधित आस्थापना बंद करण्यात येतील.

● मे. महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या आदेशातील अटी/मार्गदर्शक सुचनानुसार धार्मिक स्थळे, विवाह संबंधित कार्यक्रम मर्यादित लोकांच्या उपस्थित करण्यास परवानगी राहील.

**(क) अंत्यविधी**

● अंत्यविधीसाठी २० व्यक्तींना परवानगी राहील. सर्व संबंधित कर्मचारी यांनी केंद्र शासनाचे धोरणानुसार लवकरात लवकर कोव्हीड-१९ चे लसीकरण करून घेण्यात यावे.

११. **ऑक्सीजन उत्पादक -**

● कच्चा माल म्हणून ऑक्सीजनचा वापर करणारे उद्योग क्षेत्रास परवानगी राहणार नाही. विकास आयुक्त यांना मात्र कोणत्याही अत्यावश्यक उपक्रमासाठी अथवा अपवादात्मक परिस्थितीसाठी आवश्यक असल्यास लेखी स्वरूपात परवानगी देता येईल.

● ऑक्सीजन निर्मीती उद्योगांनी त्यांच्या ऑक्सीजन साठ्यातील (वास्तवीक तसेच क्षमतेच्या आधारे) काही टक्केवारी वैद्यकीय किंवा औषध निर्मीतीकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्दिष्ट केल्याप्रमाणे राखून ठेवण्यात यावी.

१२. **ई-कॉमर्स -**

● अत्यावश्यक वस्तु व सेवासाठी ई-कॉमर्स सुविधा चालू राहतील.

● एकापेक्षा जास्त कुटुंब असलेल्या इमारतीमध्ये घरपोच सेवाही इमारतीच्या प्रवेश दारापर्यंत मर्यादीत असली पाहिजे. इमारतीमधील अंतर्गत हालचाल ही इमारतीमध्ये नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी करण्यात यावी. घरपोच सेवा देणारे व इमारतीमध्ये नियुक्त कर्मचारी यांचा संवाद हा शिस्तबद्ध व कोव्हीड योग्य असणे आवश्यक आहे.

● सदर नियमांचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तीवर रुपये १०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

● वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनाचे परवाना रद्द करणे अथवा मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबधित आस्थापना बंद करण्यात येतील. मे. महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या आदेशातील अटी/मार्गदर्शक सुचनानुसार धार्मिक स्थळे, विवाह संबधित कार्यक्रम मर्यादित लोकांच्या उपस्थित करण्यास परवानगी राहील.

१३. **सहकारी गृहनिर्माण संस्था.**

● ५ पेक्षा जास्त रूग्ण एखादया सोसायटीत आढळल्यास ती इमारत मिनी कंटेन्मेट म्हणून घोषीत करण्यात येईल. इमारतीसमोर तसा फलक लावण्यात येईल. त्याठिकाणी बाहेरच्या व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही.

● सोसायटीमध्ये प्रवेश करणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या व्यक्तीवर सोसायटीमार्फत देखरेख ठेवण्यात यावी.

● सदर नियमांचे उल्लघंन करणाऱ्या सोसायटीवर रुपये १००००/-याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वारंवार उल्लघंन केल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

● सोसायटीमध्ये नियमित येणाऱ्या कामगांराची (RTPCR/RAT/Tru NA/CBNAAT) चाचणी करण्यात यावी. किंवा भारत सरकार द्वारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार लसीकरण करून घ्यावे.

१४. **बांधकाम क्षेत्रे**

● बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी मजूर, कामगार राहत असतील ती बांधकाम क्षेत्रे चालू राहतील. केवळ बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्यांची वाहतूक करण्यासाठी परवानगी राहील.

● सर्व संबंधितांचे केंद्र शासनाचे धोरणानुसार कोव्हीड-१९ लसीकरण करून घ्यावे.

● एखादा कामगार कोरोना बाधित असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यास वैद्यकिय रजा मंजूर करण्यात यावी व कामावरून काढून टाकण्यात येऊ नये व त्यास पुर्ण वेतन अदा करण्यात यावे.

● आगामी मान्सूनच्या अनुषंगाने लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधकाम क्रिया आवश्यक असलेल्या ठिकाणी स्थानिक प्रशासनाद्वारे परवानगी देण्यात येईल.

● सदर नियमांचे उल्लघंन करणाऱ्या आस्थापनावर रुपये १००००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल.

उपरोक्त ठिकाणे/कार्यकम येथील संबंधीत आयोजक तसेच आस्थापना मालक/चालक/ व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पो. उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक १४ एप्रिल २०२१ रोजी दिलेला आहे.

**डॉ. जय जाधव,**

नवी मुंबई. पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई.

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ मे २०२१

### शुध्दीपत्रक

क्रमांक टीपीबी-४३२०/२९७/प्र.क्र. १५३/२०२०/नवि-११.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टीपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दिनांक ८ मे २०१८ (यापुढे याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ (यापुढे याचा उल्लेख " उक्त नियमावली " असा करणेत आलेला आहे) ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अे मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक २२ जून २०१८ रोजी निर्गमित केले असून त्यानुसार उक्त नियमावली दिनांक १ सप्टेंबर २०१८ पासून अंमलात आली आहे आणि ज्याअर्थी, त्यानंतर शासनाने समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दिनांक २९ जून २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दिनांक ३० जून, २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक २१ सप्टेंबर २०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील सारभूत स्वरुपाचे बदल ईपी-१ ते ईपी-१६८ ला ( ठराविक ईपी व निर्णयार्थ प्रलंबित ठेवलेल्या ठराविक तरतुदी वगळून) मंजूरी प्रदान केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम १७(३)(अे) ते १७(३)(डी) मध्ये उक्त नियमावलीतील विनियम ३३ अंतर्गत विकास प्रस्तावातील विविध आरक्षित जमिनीचे विकासासंबंधी तरतुदी आहेत आणि उक्त नियमावलीतील विनियम १७(३)(ई) ची तरतूद ही मेट्रो इंटरचेंजच्या ५०० मीटर अंतरामध्ये समाविष्ट होणाऱ्या जमिनीचे विकासाबाबत आहे आणि मेट्रो इंटरचेंज हे उक्त विनियमातील विनियम ३३ अन्वये विकास/ पुर्नविकासाच्या प्रकारामध्ये मोडत नाही आणि त्यामुळे विनियम १७(३)(ई) उक्त नियमावलीतील विनियम ३३ अंतर्गत विकास / पुर्नविकास प्रस्तावातील विविध आरक्षित जमिनीचे विकासासंबंधीच्या प्रकारामधून वेगळा करणे गरजेचे आहे आणि त्यामुळे उक्त नियमावलीतील विनियम १७(३)(ई) ला पुनर्क्रमांकन देणे आवश्यक आहे आणि त्याकारणास्तव शुध्दीपत्रक निर्गमित करणे आवश्यक आहे अशी शासनाची खात्री झाली आहे.

आणि त्याअर्थी, मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १७ (३)(ई) ला पुनर्क्रमांकन देण्यासाठी उक्त विनियमामध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

### शुध्दीपत्रक

| या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|
| १७(३)(E) मेट्रो स्टेशन इंटरचेंजेस | १७(४) मेट्रो स्टेशन इंटरचेंजेस |

सदर शुध्दीपत्रकाची प्रत नागरीकांचे अवलोकनार्थ तीस दिवसांचे कालावधीपर्यंत खालील ठिकाणी कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध राहील.

(१) प्रमुख अभियंता ( विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, ' ई ' ब्लॉक, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

सदर शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर सुद्धा उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**निर्मलकुमार पं. चौधरी,**
शासनाचे अवर सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 18th May 2021.

*CORRIGENDUM*

No. TPB-4320/297/CR- 153 /2020/UD-11.— Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act "), the State Government *vide* Notification No. TPB-4317/629/CR 118/ 2017/DP/UD-11, Dated 8th May 2018 (hereinafter referred to as " the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai along with the Development Control and Promotion Regulations -2034 for Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Regulations") with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued corrigendum of even number dated 22nd June, 2018 as per which said Regulations have come into force from 1st September 2018 and whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum dated 29th June 2018 to the said Notification, which is published in *Government Gazette* dated 30th June 2018 ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Notification dated 21st September 2018 has sanctioned EP-1 to EP-168 (Excluding certain EP and provisions which are kept in abeyance ) in the Development Control and Promotion Regulations-2034 ;

And whereas, the provisions of Regulation 17(3)(A) to 17(3)(D) of the said Regulations deals with the manner of development of reserved land falling under the various provisions of Regulation 33 and the provision of Regulation 17(3)(E) of the said Regulations is regarding development of lands falling within 500m. of any Metro Station interchanges and as the proposal of Metro Interchanges does not fall within the category of development / redevelopment of Regulation 33 of the said Regulations, and therefore the Regulation 17(3)(E) is to be separated from the development of reserved land falling under the category of development / redevelopment of Regulation 33 and therefore it is expedient to renumber Regulation 17(3)(E) of the said regulations, and for that purpose Government is of the opinion that, it is necessary to issue a corrigendum to that effect.

Now, therefore, this Corrigendum is issued to the Development Control and Promotion Regulations-2034 to renumber Regulation 17(3)(E) of the said Regulations as mentioned herein below.

*CORRIGENDUM*

| **Instead of** | **Read as** |
|---|---|
| 17(3)(E) Metro Station Interchanges: | 17 (4) Metro Station Interchanges: |

Copy of this Corrigendum is kept open for the inspection of the public in the following offices during office hours on all working days for 30 days.

(1) Chief Engineer (Development Plan), Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, “E' Block, ENSA Hutment, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

This corrigendum is also available on the Government of Maharashtra website : *www.maharashtra.gov.in* (Acts/ Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NIRMALKUMAR P. CHAUDHARI,
Under Secretary to Government.

**सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), रत्नागिरी यांजकडून**

**आदेश**

क्रमांक जिदुविअ/रत्ना/क/श्रीसांबा दुग्ध/नोंरआ/२३९/२०२१.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ व कलम १०९(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, मी, सुधीर कांबळे, सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), रत्नागिरी या आदेशाद्वारे श्रीसांबा सहकारी दुध उत्पादक संस्था मर्यादित, घाटिवळे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी नोंदणी क्रमांक आरटीजी/एसजीआर/एजीआर/ओ/१२५३/डी/१९९६-१९९७, दिनांक १८ जानेवारी १९९७ या संस्थेची, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ नुसार संस्थेची नोंदणी व संस्थेचा नोंदणी क्रमांक रद्द करीत आहे.

या आदेशाचे तारखेपासून संस्थेचे अवसायन कामकाज बंद झाले आहे व संस्थेची नोंदणी रद्द झाली आहे असे समजण्यात यावे.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी दिला आहे.

**सुधीर कांबळे,**

रत्नागिरी, सहायक निबंधक,

दिनांक २६ फेब्रुवारी २०२१. सहकारी संस्था (दुग्ध), रत्नागिरी.

---

**सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), रत्नागिरी यांजकडून**

**आदेश**

